# मुंबई विद्यापीठ

**निवडणूक विभाग**

## जाहीर प्रकटन

क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/८००

**नोंदणीकृत पदवीधर मतदार संघातुन अधिसभेसाठीची निवडणूक – २०२२**

**पदवीधरांच्या नोंद वहीत नोंद करणे/नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत नाव समाविष्ट करणे**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ८(७) च्या अनुषंघाने शासनाकडुन मिळालेल्या निर्देशानुसार दिनांक १७ ऑगष्ट २०२३ रोजी नोंदणीकृत पदवीधर मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. तदनंतर व्यवस्थापण परिषदेने गठीत केलल्या समीतीने दिलेल्या अहवाला नुसार व व्यवस्थापन परिषदेने दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजी पारित केलेल्या ठरावा नुसार मुंबई विद्यापीठाची नोंदणीकृत मतदार संघाची यादी नव्याने तयार करण्यासाठी नव्याने जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

मुंबई विद्यापीठाच्या पदवीधरांना या प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या अधिसभेवरील पदवीधर मतदार संघातून दहा नोंदणीकृत पदवीधरांची निवड करण्यासाठी नविन मतदार यादी तयार करणे व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३१(३) अन्वये ‘‘नोंदणीकृत पदवीधर होऊ इच्छिणारी प्रत्येक व्यक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात कुलसचिवांकडे अर्ज करील आणि अशी फी भरील.’’ यानुसार ज्यांनी मुंबई विद्यापीठाची पदवी प्राप्त केलेली आहे अशा इच्छुक व्यक्तींची विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदवहीत नाव नोंदविण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात येत असून इच्छुक पदवीधरांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://mu.ac.in वरील Election - 2022 किंवा http://mu.eduapp.co.in यावर अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत.

**पदवीधरांच्या नोंद वहीत नोंद करण्यासाठी/नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी खालील बाबींची नोंद घ्यावी :-**

**अ) नव्याने नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी करण्यासाठी :-**

१. नव्याने नोंदणीकृत पदवीधर म्हणुन नोंदणी करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. नव्याने नोंदणीकृत पदवीधरांकरीता नाव नोंदणी शुल्क रू २०/- असेल.

**ब) दिनांक ९ नोव्हेंबर २०२२ च्या जाहीर प्रकटनानुसार अर्ज भरून शुल्क भरलेल्या अर्जदारांसाठी :-**

ज्या पदवीधरांनी याआधी दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ च्या जाहीर प्रकटनानुसार नोंदणीकृत मतदारांच्या मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी अर्ज केलेले असतील असे अर्जदार या आधी तयार केलेल्या लॉगिन आयडी (Login ID) द्वारे आपले अर्ज भरु शकतात, अशा अर्जदारांना या आधी २० रु. अर्जाचे शुल्क भरले असल्यास नव्याने अर्जाचे शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**टिप :- या जुन्या अर्जदारांपैकी ज्या अर्जदारांना आपले जुने युजर आयडी व पासवर्ड आठवत नसतील असे अर्जदार 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे नव्याने नोंदणी करू शकतात.**

**क) उपरोक्त अ व ब अर्जदारांनी खालील बार्बीची नोंद घ्यावी**

१. नोंदणीकृत पदवीधर मतदार म्हणून नाव नोंदणीचे अर्ज दिनांक **३० ऑक्टोबर, २०२३** पासून सुरू होईल.
२. नोंदणीकृत पदवीधरामध्ये मतदार म्हणून नाव नोंदणी दिनांक **३० नोव्हेंबर २०२३ सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत करता येईल.
३. मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर असलेल्या व्यक्तीच फक्त मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी नोंदणी करतील.
४. ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज करताना स्वाक्षरी (JPG), मुंबई विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र (PDF) व निवासाचा पुरावा (JPG) स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे.
५. विवाहित महिला पदवीधरांनी लग्नानंतरच्या नविन नावाने नोंदणी करण्यासाठी विवाह नोंदणी प्रमाणपत्र/शासन राजपत्र (PDF) यापैकी कोणतेही एक कागदपत्र अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

**टिप :- अर्जासोबत खालील कागदपत्रे** (Soft Copy) **अपलोड करणे आवश्यक आहे.**

**१.** स्वाक्षरी
**२.** मुंबई विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र, (झेरॉक्स असल्यास सांक्षांकीत प्रत).
**३.** निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) यापैकी एक पुरावा.
**४.** नावात बदल असल्याबाबतचे प्रमाणपत्र (विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Certificate) किंवा शासन राजपत्र (Govt. Gazzatee)) (आवश्यकता असल्यास)

**पदवीधरांच्या नोंद वहीत नोंद करण्यासाठी/नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी Online पध्दतीने नोंदणी करताना खालील पध्दतीचा अवलंब करावा:-**

१. विद्यापीठाच्या http://mu.ac.in वरील **Election – 2022** किंवा http://mu.eduapp.co.in या link वर Click करावे.
२. मतदार म्हणून नोंदणी (Registration) करण्याकरीता निवडणूक - २०२२ च्या मुख पृष्ठावरील (Home page) Login/Registration या Tab वर Click करावे.
३. सदर पोर्टलवर पदवीधर मतदार म्हणून नोंदणी करण्याआधी HELP Document वाचावे.
४. Login/Registration हा पर्याय निवडल्यानंतर आपणांस Login/Registration हा पर्याय उपलब्ध होईल.
५. नविन नोंदणी करू इच्छिणाऱ्या अर्जदारांनी नोंदणी (Registration) करून User Id व Password तयार करण्यासाठी Registration हा पर्याय निवडावा.
६. नोंदणी (Registration) च्या पर्यायामध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

   क) Password तयार करतांना त्यामध्ये Alphabet व Numeric यांचा वापर करून कमीतकमी आठ (८) संख्येएवढा Password तयार करावा. (Special character चा वापर करू नये.

ख) पदवी प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणेच ऑनलाईन मतदार नोंदणी अर्जात नोंदणी करतांना नाव नोंदवावे. (उदा. प्रथम नाव, मधले नाव, आडनाव व आईचे नाव) **सबंधीत जागेवर योग्य नावाची नोंद करावी.**

ग) जर पदवी प्रमाणपत्रावर मधले नाव (Middle Name) किंवा आडनाव (Surname) या पैकी एखादे नाव नसेल तर संबधित रकान्यात (.) असे टाईप करावे.

घ) सर्व माहिती भरून प्रविष्ट केल्यानंतर आपली नोंदणी (Registration) प्रक्रिया पूर्ण होईल व आपला User Id व पासवर्ड तयार होईल. तो आपल्या Email Id किंवा मोबाईलवर पाठविण्यात येईल.

ङ) भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) व ई-मेल आयडी (E-mail ID) हा अचुक भरावा. विद्यापीठाद्वारे निवडणूकीसंबंधी काही माहिती संबंधीत मतदारास पाठवायची असल्यास ती त्याच्या भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) किंवा ई-मेल आयडी (E-mail ID) वर पाठविण्यात येईल. त्यामुळे भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) व ई-मेल आयडी (E-mail ID) अचुक नसल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

७. User Id आणि Password ची नोंदणी (Registration) झाल्यानंतर Login या पर्यायामध्ये User Id व password व इतर माहीती प्रविष्ट करून Login करावे.

८. **ज्या अर्जदारांनी दिनांक ९ नोव्हेंबर २०२२ च्या जाहीर प्रकटनानुसार अर्ज भरून शुल्क भरले असेल अशा अर्जदारांनी आपल्या जुन्या युजर आयडी लॉगिन आणि पासवर्ड व इतर माहिती प्रविष्ठ करून लॉगिन करावे.**

९. मतदार नोंदणी अर्ज (Voter Registration Form) वरील सर्व माहिती अचूक भरावी.

१०. पदवी प्रमाणपत्रावरील क्रमांकाप्रमाणेच ऑनलाईन मतदार नोंदणी अर्जामध्ये दर्शविलेल्या ठिकाणी पदवी क्रमांक नोंदवावा. **उदा. 20-BARC-200-0001-00005575 यानुसारच "Numric", "Alphabet" व "-"** यांचा वापर करूनच प्रमाणपत्रावरील क्रमांक नोंदवावा. या व्यतिरिक्त कशाचाही वापर करू नये. जर पदवीवर वर क्रमांक नसेल तर **NA** नोंदवावे.

११. संबंधीत ठिकाणी कागदपत्रे, सही upload करावीत (सदर कागदपत्रे अर्ज भरण्याआधी Soft Copy मध्ये उपलब्ध करून ठेवावी. सही व निवासाचा पुरावा हे JPG or PNG Format मध्ये असावे व इतर कागदपत्रे PDF Format मध्ये असावीत.)

१२. कागदपत्रे इत्यादीची मुळ प्रतीची PDF/JPG Soft Copy मध्ये अपलोड करावी, **छायांकीत प्रत अपलोड करावयाची असल्यास त्यास अर्जदारांने स्वंय साक्षांकन करणे आवश्यक आहे.**

१३. संपुर्ण Voter Registration अर्ज Preview मध्ये उपलब्ध होतो. तो आधी बघून आपण भरलेली माहिती अचूक आहे याची खात्री करावी. जर माहिती मध्ये काही दुरूस्ती हवी असल्यास Previous option वर click करून आपणांस हवी असलेली माहिती दुरूस्त करून घ्यावी.

१४. आपण भरलेली माहिती व कागदपत्रे ही अचुक असल्याची खात्री झाल्यानंतर आपण Proceed for Payment option वर click करावे. Proceed for Payment option वर click केल्यानंतर आपणांस Voter Registration अर्जामधील कोणत्याही माहितीमध्ये बदल करता येणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

१५. Payment option मध्ये दर्शविण्यात आलेल्या पर्यायांपैकी एका पर्यायाद्वारे Payment करावे.

१६. **Payment झाल्यानंतर software द्वारे भरलेल्या अर्जाची Print Out सर्व कागदपत्रासह (नावनोंदणी अर्ज, पदवी, निवासाचा पुरावा, शुल्क भरल्याची पावती व नाव बदल असल्यास संबंधित कागदपत्रे (आवश्यकता असल्यास)) दि. ३ नोव्हेंबर, २०२३ नंतर आपल्या लॉगिनमध्ये उपलब्ध होईल. सदर Print Out विद्यापीठाकडे खोली क्रमांक ११०, निवडणुक विभाग, फोर्ट, मुंबई येथे अंतिम दिनांकाआधी (दि. ०४ डिसेंबर, २०२३ रोजी सांय. ५.०० वा.पर्यंत) सादर (Submit) करणे आवश्यक आहे अन्यथा आपला अर्ज ग्राहय धरला जाणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

----4/-

उपरोक्त अर्जावर असलेल्या माहितीच्या सत्यतेबाबत संबंधित अर्ज भरणारा अर्जदार जबाबदार राहील व त्याने भरलेल्या चुकीच्या माहितीबाबत विद्यापीठाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

नोंदणीकृत पदवीधरांना असे कळविण्यात येते की, ज्या नोंदणीकृत पदवीधरांना मतदार म्हणून नाव नोंदणी करतांना संगणक व इंटरनेट सेवा इत्यांदीची उपलब्धता नसेल त्यांनी त्यांच्या जवळ असणाऱ्या महाविद्यालयात किंवा विद्यापीठ उपकेंद्रात जाऊन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत आपला मतदार नोंदणी अर्ज भरावा. या बाबतच्या सूचना सर्व संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना व विद्यापीठ उपकेंद्रातील संचालक/समन्वयक यांना देण्यात आलेल्या आहेत.

**टिप :- १) सदर निवडणूक मतदार यादीमध्ये नोंदणी करण्याकरीता उपलब्ध असलेले Software Microsoft Edge (Latest Version), Google Crome (Latest Version), Mozilla (Latest Version) या Browsers मध्येच Open करावे.**
**२) Browsers मधील Popup सदर Software करीता Allow/Activate करावा.**

**अर्जामध्ये आपली माहिती वर नमुद केलेल्या पध्दतीनुसार सोमवार, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ ते गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३ रोजी, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://mu.ac.in (Election-2022) किंवा http://mu.eduapp.co.in येथे भरता येईल.**

सदर अधिसूचनेच्या संदर्भात काही शंका/अडचणी असल्यास कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भ्रमणध्वनी क्रमांक 91-9152316641, 91-9152316642, 91-9152316643 व दुरध्वनी क्रमांक 022-68320012, 022-68320017 वर संपर्क साधावा.

सॉफ्टवेअर मधील Technical सहाय्यतेकरीता 91-7796171723, 91-7796171729, 91-7796171731, 91-7796171746, 91-7796171768, 91-7796171770, 91-7796171774, 91-7796171775, 91-7796171792 आणि 91-8767755647. वर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

नोंदणीकृत पदवीधर या मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये नोंद होण्यासाठी विहीत ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त इतर आलेले अर्ज, अपूर्ण अर्ज तसेच आवश्यक ती कागदपत्रे अपलोड न केलेले अर्ज नाकारले जातील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

या संदर्भातील निर्देश, प्रकटन, निवडणूक कार्यक्रम, निवडणूक सूचना, मतदार याद्या इ. बाबी फक्त विद्यापीठाच्या http://mu.ac.in (Election-2022) किंवा http://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केल्या जातील. सबब, विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील संबंधित माहिती सर्व संबंधितांनी वेळोवेळी ज्ञात करुन घेणे आवश्यक आहे. या संदर्भात इतर कोणताही पत्रव्यवहार, ई-मेलने उत्तर देणे इ. केले जाणार नाही, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

याच प्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३१(२) नुसार खालील व्यक्ती नावनोंदणीसाठी अपात्र असतील.

(क) विकल मनाची असेल व एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल; किंवा
(ख) अमुक्त नादार असेल; किंवा
(ग) ज्यात नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा एखाद्या अपराधाबद्दल जिला दोषी ठरविण्यात आले असेल; किंवा
(घ) लबाडीच्या मार्गाने एखादी पदवी मिळविली असेल; किंवा
(ड) राज्यात कायाद्याद्वारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर असेल;

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनील भिरुड)
प्रभारी कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.